# मंत्रिमंडळ निर्णय
## ११ जानेवारी २०११

१. सिंचन व बिगरसिंचन पाणीपट्टीवरील पोकळ पाणीपट्टी आकारणीत सवलत

२. राज्य माहिती आयुक्त रामानंद तिवारी यांच्या गैरवर्तनाबाबत राज्यपालांकडे शिफारस

३. करमणूक शुल्क आकारणीतील विसंगती दूर करण्याबाबत.

४. राज्य लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवर सह सचिवांची दोन पदे मंजूर

५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.

---o---

## सिंचन व बिगरसिंचन पाणीपट्टीवरील पोकळ पाणीपट्टी आकारणीत सवलत

सिंचन व बिगरसिंचन पाणीपट्टीवरील पोकळ पाणीपट्टी आकारणीत सवलत देण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला.

१. सिंचन लाभधारकांच्या दि.१ एप्रिल २०१० रोजी प्रलंबित असलेल्या सिंचन पाणीपट्टी थकबाकीपैकी पोकळ पाणीपट्टी व पोकळ पाणीपट्टीवरील विलंब आकारणी रक्कम माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. महानगरपालिका, नगरपालिका व इतर पिण्याच्या पाण्याच्या योजनांची पिण्याच्या पाण्यासंबंधी दिनांक ३१/३/२०१० रोजी प्रलंबित असलेल्या पाणीपट्टी थकबाकीपैकी पोकळ पाणीपट्टी व पोकळ पाणीपट्टीवरील विलंब आकारणी रक्कम माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३. बिगरसिंचन लाभधारकांची औद्योगिक पाणीवापरासंबंधी दि.१ एप्रिल २०१० रोजी प्रलंबित असलेली पोकळ पाणीपट्टीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या दि. ३१ मार्च २०१० पर्यंतच्या बिगरसिंचन पाणीपट्टी थकबाकीपैकी पोकळ पाणीपट्टी व पोकळ पाणीपट्टीवरील विलंब आकारणी वगळता उर्वरित रक्कम भरण्याच्या अटीच्या अधीन राहून माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शेतकऱ्यांच्या घरगुती अडचणींमुळे किंवा पिकांवर रोगराई पडते अथवा नदीकाठची पिके पुरात वाहून जातात अशा कारणांमुळे त्यांना मंजूर असलेल्या पाणीसाठ्याइतके पाणी ते वापरतातच असे नाही. तथापी, नियमानुसार त्यांना पाणी मंजूर केले असल्याने सिंचनाची पाणीपट्टी आकारली जाते. अशा शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात न वापरलेल्या पाण्यावर आकारली गेलेली पाणीपट्टी ही पोकळ पाणीपट्टी ठरते.

या निर्णयामुळे सिंचन पाणीपट्टी आकारणीवरील पोकळ पाणीपट्टीची १२ कोटी ३८ लाख अधिक त्यावरील विलंब आकारणी १ कोटी २२ लाख अशी एकूण १३ कोटी ६० लाख रूपये रक्कम माफ करण्यात येणार आहे. तसेच बिगरसिंचन पाणीपट्टी आकारणीवरील पोकळ पाणीपट्टीची ६६ कोटी ८४ लाख अधिक त्यावरील विलंब आकारणी ५ कोटी २२ लाख अशी एकूण ७२ कोटी ६ लाख रूपये रक्कम माफ करण्यात येणार आहे. सिंचन व बिगरसिंचन पोकळ पाणीपट्टी व विलंब आकारणी याची एकूण रक्कम ८५ कोटी ६६ लाख एवढी होते.

---o---

**११ जानेवारी २०११**

## राज्य माहिती आयुक्त रामानंद तिवारी यांच्या गैरवर्तनाबाबत राज्यपालांकडे शिफारस

राज्य माहिती आयुक्त रामानंद तिवारी यांच्याविरुध्द त्यांच्या गैरवर्तनाबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १७ अंतर्गत सर्वोच्च न्यायालकडे संदर्भ करण्याची शिफारस राज्यपाल यांच्याकडे करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची चौकशी चालू असेपर्यंत माहिती अधिकार अधिनियमाखाली राज्यपालांनी प्राप्त शक्तीचा वापर करून राज्य माहिती आयुक्त तिवारी यांना या पदावरून निलंबित करावे व त्यांना चौकशी चालू असेपर्यंत कार्यालयात उपस्थित राहण्यास मनाई करावी अशी शिफारस करण्याचाही मंत्रिमंडळाने निर्णय घेतला.

मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची प्रतीक्षा न करता वरील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यास मंत्रिमंडळाने परवानगी दिली.

---o---

## करमणूक शुल्क आकारणीतील विसंगती दूर करण्याबाबत

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ अनुसार करमणूक शुल्काच्या विविध प्रकारांवर कलम ३ मधील तरतुदीनुसार करमणूक शुल्क आकारण्यात येते.

वरील कलम ३ मध्ये करमणूक शुल्क आकारण्याच्या दोन पध्दती विहित करण्यात आल्या आहेत.

त्यापैकी पहिल्या पध्दतीमध्ये कलम ३ (१) (ब) अनुसार एकूण प्रवेशमुल्याच्या (Gross Value) विशिष्ट टक्केवारीइतके करमणूक शुल्क आकारण्यात येते. दुसऱ्या पध्दतीमध्ये कलम ३ (१) (क) अनुसार आयोजकाने निश्चित केलेल्या रकमेवर (Payment fixed by the proprietor) विहित दराने करमणूक शुल्क आकारण्यात येते.

वरील तरतुदींमुळे एकाच अधिनियमात कर आकारणीच्या दोन पध्दती अस्तित्वात आहेत. कलम ३ (१) (क) लागू असलेल्या कार्यक्रमांच्या तुलनेत, कलम ३ (१) (ब) लागू असलेल्या कार्यक्रमांसाठी प्रेक्षकांना जादा करमणूक शुल्क अदा करावे लागते.

करमणूक शुल्क आकारणीच्या पध्दतीचे सुसूत्रीकरण करून, कर आकारणीची पध्दत सुलभ करण्याच्या दृष्टिकोनातून कलम ३ (१) (ब) मध्ये सुधारणा करून, आयोजकांनी निश्चित केलेल्या रकमेवर करमणूक शुल्क आकारण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे.

सध्या वरील कलम ३ (१) (ब) अनुसार फक्त महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रांतील कार्यक्रमांवर करमणूक शुल्क आकारण्यात येते. या कलमाची व्याप्ती वाढवून वरील क्षेत्रांव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांसाठी १० टक्के इतका करमणूक शुल्काचा दर विहित करण्याचाही मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. यामुळे राज्याच्या उत्पन्नात भर पडेल.

वरील सुधारणा करण्यासाठी अध्यादेश प्रख्यापित करण्याची विनंती मा.राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

----o----

११ जानेवारी २०११

## राज्य लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवर सह सचिवांची दोन पदे मंजूर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवर सह सचिवांची दोन पदे नव्याने निर्माण करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. ही पदे रुपये १५६००-३९१०० अधिक रुपये ७६००/- ग्रेड वेतन या वेतनश्रेणीतील आहेत.

आयोगाच्या परिक्षार्थींमध्ये झालेली प्रचंड वाढ, आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षा यामुळे आयोगाच्या कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आयोगाचे कामकाज सुविहितपणे चालावे यासाठी सह सचिव दर्जाची दोन पदे नव्याने मंजूर करण्याची विनंती आयोगाने शासनास केली होती.

या दोन नवीन पदांमुळे वार्षिक वित्तीय भार १६ लाख रुपयांनी वाढणार आहे.

---o---

**११ जानेवारी २०११**

## महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या सुधारणांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १७ सप्टेंबर २०१० रोजी प्रकाशित करण्यात आलेला सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा मागे घेऊन नवीन अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्यासाठी मान्यता देण्याची राज्यपालांना विनंती करण्यास मान्यता दिली.

या मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त निर्गमित होण्यापूर्वीच पुढील कार्यवाही करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

---o---